# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता.११/०३/२०२०**

**गुन्हे शाखा,युनिट-३, पिंपरी-चिंचवडची कारवाई**

**पिस्तोल बाळगणाऱ्या सराईत आरोपीस गुन्हे शाखेकडून अटक, ०१ पिस्तोल व ०२ काडतुसे जप्त**

दि.१०/०३/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट-३, चे सहा. पोलीस निरीक्षक सतिश कांबळे व पोलीस पथक चाकण भागात धुलीवंदन सणाचे निमीत्त पेट्रोलींग फिरत असताना पोलीस हवालदार सानप व चव्हाण यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिति मिळाली की, "नानेकरवाडी चाकण येथे राहणाराइंदर पंजाबी ऊर्फ भैया ज्याने अंगात निळया रंगाचा पिवळी फुले असलेला शर्ट व बदामी रंगाची पॅन्ट असे कपडे घातलेला असुन, त्याच्याकडे एक पिस्तुलअसुन तो नानेकरवाडी चौकात, खेड, जि.पुणेयेथे थांबलेला आहे" वगैरे मजकुरची माहिती मिळताच सपोनि कांबळे यांनी सदरची माहीती वरीष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबरयांना कळविली. वरीष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर यांनी दिलेल्या मार्गदर्शनाखाली व योग्य सुचना प्रमाणे सपोनि सतिश कांबळे यांनी स्टाफसह नानेकरवाडी, चाकण परीसरात सापळा लावुन शिताफीने पकडले. त्याची जागीच अंगझडती घेतली असता त्याचे कमरेचे डावे बाजुस एक देशी बनावटीचे पिस्तोल खोचलेले मिळुन आले. पिस्तोलची पाहणी करता त्यामध्ये ०२ जिवंत काडतुसे असल्याचे निदर्शनात आहे. सदर इसमाचे नाव इंदरसिंग रामलालसिंग राजपुत वय २९ वर्षे, रा. प्रविण कामठे यांचे खोली नं. ०७ मध्ये, नानेकरवाडी गावठाण, चाकण, ता. खेड,जि.पुणेअसे असल्याचे समजले. त्याचेवरूध्द चाकण पोलीस ठाणे येथे त्याचे विरूध्द शस्त्र अधिनियम कलम ३ (२५) तसेच सह कलम महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यामध्ये त्यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीवर यापुर्वी पुणे शहर येथे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१. सिंहगडरोड पोलीस ठाणे गु.र.नं.७०/२०१७, भा.द.वि.कलम ३७९
२. शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.नं.९३/२०१८, भा.द.वि.कलम ३९९ आर्म अॅक्ट कलम ४ (२५)

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त, श्री. सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त श्री आर.आर. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर बाबर, सहा.पोलीस निरीक्षक सतिश कांबळे तसेच पोलीस हवालदार पो.हवा.विठ्ठल सानप, गंगाधर चव्हाण, हजरत पठाण, पो.ना. सचिन मोरे, योगेश कोळेकर, यदु आढारी, त्रिनयन बाळसराफ, सागर जैनक, राजकुमार हनमंते, महेश भालचिम, प्रमोद ढाकणे, राहुल सुर्यवंशी यांचे पथकाने केली आहे. अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक सतिश कांबळे हे करीत आहेत.

(शंकर बाबर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट-३, पिंपरी-चिंचवड